महाराष्ट्र शासन

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्रमांक:- पोमसं/१६/३६९९/कवृंप-५४ वी सभा/४८/२०१६-२०२३ मुंबई, दि. २७/०२/२०२३

**विषय:- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद-५४ वी सभा**

***

५४ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद सभा सोमवार, दि.२०/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. पोलीस महासंचालक म.राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये ५३ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमधील ३३ मुद्यांचा आढावा व ५४ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी उपस्थित केलेले १८ मुद्दे तसेच आयत्यावेळी उपस्थित केलेले १८ मुद्दे असे एकूण ६९ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालसास सादर करावा.

२. घटक प्रमुख यांनी सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी/अंमलदारांच्या निदर्शनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकांवर लावण्यात यावा. त्याचबरोबर, ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच, ह्या कार्यवृत्तांताच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देवून, त्याबाबत त्यांचे काही म्हणणे(Say/Opinions) असल्यास, ते एक महिन्याच्या आंत या कार्यालयास कळविण्याविषयी व या मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयास प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

**(प्रविण साळुंके)**
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),(अति.कार्य.)
पोलीस महासंचालक, म. राज्य, मुंबई यांचेकरीता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके म.राज्य, मुंबई(सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, म.राज्य, मुंबई(सस्नेह)
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह व बृहन्मुंबई वगळून)

अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती /दहशतवाद विरोधी पथक/वाहतुक/फोर्स वन/
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळवळण व परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे
रा.रा.पो.बल /आर्थिक गुन्हे शाखा, म.राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक/महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स वन/ नागरी हक्क संरक्षण/महिला अत्याचार प्रतिबंधक/
सायबर गुन्हे/सागरी सुरक्षा व विशेष सुरक्षा, रा.गु.वि/व्ही.आय.पी.सुरक्षा,
रा.गु.वि./विशेष सुरक्षा विभाग, दादर, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग,महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक,नक्षल विरोधी अभियान,नागपूर/राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस उपआयुक्त, सशस्त्र पोलीस प्रशिक्षण , क्रिडा व कल्याण , कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग/मोटार परिहन विभाग / दळवळण व परिवहन /विशेष कृती/नागपूरसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.
पोलीस अधीक्षक, शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे.

**प्रत महितीसाठी:-**

अपर पोलीस महासंचालक, कायदा व सुव्यवस्था/प्रशासन/आस्थापना/नियोजन व समन्वय/धोरण/
/महाराष्ट्र राज्य, मुंबई
विशेष पोलीस महानिरीक्षक, कायदा व सुव्यवस्था/आस्थापना/प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य,मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व. स)/सरसंपादक, दक्षता/कायदा व सुव्यवस्था/
प्रशासन, महाराष्ट्र राज्य मुंबई
पोलीस अधीक्षक, राज्य नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व वरिष्ठ उपसहायक/उपसहायक
पोलीस महासंचालक यांचे विधी सल्लागार/विधी अधिकारी.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, पो.म.सं कार्यालय, म.रा.मुंबई

**प्रत,**

अपर पोलीस महासंचालक यांचे स्वीय सहाय्यक, पो.म.सं कार्यालय, म.रा.मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,**

सर्व कार्यासन अधिकारी, का.क्र. ०१ ते ४४, पोमसं कार्यालय, म.राज्य, मुंबई

२/- यांनी कार्यवृत्तामधील त्यांच्या कार्यासनाशी संबधित ज्या मुद्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याबाबत संबंधित वरिष्ठ अधिका-यांच्या मान्यतेने विनाविलंब करावी व त्या संबंधिचा पूर्तता अहवाल/अभिप्राय त्वरीत कार्यसन क्रमांक १६ यांचेकडे पाठवावे.

## सदर बैठकीचे कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे.:-

५४ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभेसाठी सर्व उपस्थितांचे मा. अध्यक्ष यांच्या वतीने पद्सिध्द सचिव, तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वागत केले. त्यानंतर पद्सिध्द सचिवांनी मा. अध्यक्ष यांना ५४ व्या सभेकरीता सुरुवात करण्याची अनुमती घेऊन सभेकरीता उपस्थित केलेल्या मुद्दे वाचण्याकामी श्री. अजय गोवारी, वरिष्ठ कार्यासन अधिकारी यांना सांगितले. त्यानंतर त्यांनी ५३ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीतील कार्यवाही करावयाचे प्रलंबित मुद्दे व ५४ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये चर्चेकरीता उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर चर्चा सुरु केली.

सदर सभेमध्ये राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या ५३ व्या सभेमधील १६ मुद्दे, ५३ व्या सभेतील आयत्यावेळी उपस्थित केलेले १७ मुद्दे व ५४ व्या सभेमध्ये उपस्थित केलेले १८ मुद्दे, तसेच आयत्यावेळी उपस्थित करण्यात आलेले १८ मुद्दे, अशा एकूण **६९** मुद्यांवर चर्चा करण्यात आली. मा अध्यक्षांनी त्यापैकी ५३ व्या सभेतील एकूण २२ मुद्दे व ५४ व्या सभेतील नवीन १८ मुद्यांपैकी ०४ मुद्दे व आयत्यावेळी उपस्थित १८ मुद्यांपैकी ०७ मुद्दे असे एकूण ३३ मुद्दे निकाली काढुन, उर्वरित **३६** मुद्यांवर मा अधक्षांनी कार्यवाहीचे आदेश/निर्देश दिलेले आहेत.

मा.अधक्षांनी निर्देश दिले की, कार्यासन अधिकारी यांनी त्यांचेशी संबंधित मुद्यांचे अभिप्राय त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांच्या संमतीने कार्यासन क्रमांक १६ कडे द्यावेत. तसेच बैठकीकरीता येताना विषयाचा पूर्ण अभ्यास करुन, त्यांच्याशी संबंधित मुद्याबाबत थोडक्यात व परिपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे, असे निर्देश दिले. त्यानंतर मा.अध्यक्षांनी सर्वांना धन्यवाद दिले, व मा. अध्यक्षांच्या वतीने पद्सिध्द सचिव, तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ५४ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद संपन्न झाली, असे जाहीर केले.

****

**५४ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा सोमवार, दि.२०/०२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये खालील पोलीस अधिकारी व अंमलदर/मंत्रालयीनअधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

| अ. क्र. | नाव पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | श्री. रजनिश सेठ, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई | पदसिध्द अध्यक्ष |
| २ | श्री. अनुप कुमार सिंह, अपर पोलीस महासंचलाक (प्रशासन), म.राज्य, मुंबई | पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३ | श्री. संजय कुमार वर्मा, अपर पोलीस महासंचालक (नि. व स.),म.राज्य, मुंबई | पदसिध्द सदस्य |
| ४ | श्री कुलवंत कुमार सारंगल, अपर पोलीस महासंचालक, (का. व सु.), म. राज्य, मुंबई | |
| ५ | श्री.संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना) म. राज्य, मुंबई | |
| ६ | श्री. चिरंजिव प्रसाद, अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म. राज्य, मुंबई. | |
| ७ | श्री रमेश धुमाळ, सहायक पोलीस महानिरीक्षक (नि.व स.),म.राज्य, मुंबई | |
| ८ | श्री मंजुनाथ सिंगे, सहायक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.) म.राज्य, मुंबई. | |
| ९ | श्री. पियुष विलास जगताप, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ | सभासद |
| १० | श्री रमेश सिताराम घोडे, पोलीस उपनिरीक्षक, वाहतुक विभाग, पिंपरी-चिंचवड | सभासद |
| ११ | श्री व्यंकट माधवराव केंद्रे, पोलीस निरीक्षक, जिन्सी पो.ठा. औरंगाबाद शहर | सभासद |
| १२ | श्रीमती कौशल्या प्रभु रांजणे, म.पोहवा/२०५०, विशेष शाखा, औरंगाबाद | सभासद |
| १३ | श्री. पुरुषोत्तम शेषराव बारड, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर | सभासद |
| १४ | श्री. गणेश नांदेकर, पोलीस नाईक/२३७१, पोलीस मुख्यालय, चंद्रपूर | सभासद |
| १५ | श्री. काशिनाथ महादेव गुरव, सहायक पोलीस उपनिरीक्षक/९०७, पोलीस मुख्यालय, रत्नागिरी | सभासद |
| १६ | श्री संदीप रामभाऊ थोरात, पोहवा/११३२, स्थानिक गुन्हे शाखा, धुळे | सभासद |
| १७ | श्री. प्रदीप वसंतराव पाटील, पोहवा/२७०२,एमआयडिएस, पो.स्टे. जळगांव | सभासद |
| १८ | श्री. प्रशांत वासुदेव पाटील, पोहवा/७७९,उरळ पोलीस ठाणे, अकोला | सभासद |
| १९ | श्री.संतोष मधुकरराव कविटकर,पोहवा/१२७५, नियंत्रण कक्ष, अमरावती ग्रामिण | सभासद |
| २० | श्री.सुरेशसिंग छगनसिंग परदेशी, पोना/१८२६, नागरी हक्क संरक्षण, नाशिक परिक्षेत्र, नाशिक | सभासद |
| २१ | श्री. पी.पी. खडपकर, पोलीस उपनिरीक्षक, स्थानिक कंपनी, रा.रा.पो.बल, गट क्र.१, पुणे | सभासद |

| अ. क्र. | नाव पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| २२ | श्री. जे. आर ईखे, सपोशि/३५७,ए कंपनी, रा.रा.पो.बल, गट क्र.१४, औरंगाबाद | सभासद |
| २३ | श्री. एम. के भंडारे, पोहवा, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे | सभासद |
| २४ | श्री. चंद्रकांत रामलाल अवस्थी, राखीव पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे | सभासद |
| २५ | श्री. विठ्ठलपंत विजयकुमार जिंदे, पोशि/१३१३, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर | सभासद |
| २६ | श्री. श्रीशैल चंद्रप्पा इमडे पोलीस महासंचालक यांचे उपसहायक(आस्था-II/विशा) म.राज्य, मुंबई | |
| २७ | श्री. प्रविण शिखरे,पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) म.राज्य, मुंबई | |
| २८ | श्रीमती कल्पना लोखंडे, पोलीस महासंचालक यांचे उपसहायक(नि.वे),म.राज्य, मुंबई | |
| २९ | श्रीमती अंजली वराडकर, पोलीस महासंचाल यांचे उपसहायक(गुन्हे), म.राज्य, मुंबई | |
| ३० | श्री अजय गोवारी वरिष्ठ कार्यास अधिकारी, कार्यासन क्र.१६ | |
| ३१ | पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासनअधिकारी/लिपिकवर्गीय कर्मचारी | |

# ५४ वी राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषदेमध्ये चर्चा झालेल्या मुद्यांची माहिती

## सोमवार, दिनांक :- २० फेब्रुवारी,२०२३

# राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद-५३ सभेचे उपस्थित केलेले मुद्याची माहिती

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५३ वी | **मुद्या क्र.४**<br>राज्य राखीव पोलीस बल दलाला मुंबई व इतर जिल्हयात कायदा व सुव्यवस्था बंदोबस्ताकरिता तैनात असताना १२ तासांपेक्षा जास्त वेळ बंदोबस्त पूर्ण होऊन बंदोबस्त संपूनसुध्दा १४ ते १६ तास जाणीवपूर्वक थांबवून ठेवतात. तरी, १२ तासापेक्षा अधिक कर्तव्य देण्यात येऊ नये. | प्रस्तुत प्रकरणी, बंदोबस्त संपल्यानंतर ताबडतोब कार्यमुक्त करण्याची पोमसं कार्यालय तसेच संबंधित युनिटची सुध्दा जबाबदारी आहे. प्रत्येक बंदोबस्त संपल्यानंतर कार्यमुक्त केले आहे किंवा नाही याबाबत विपोमनि (का. व स.) यांनी खात्री करणे आवश्यक आहे. तसेच अपोमसं (रा.रा.पो.बल) यांनीही मॉनिटरींग करणे आवश्यक आहे. परिपत्रक सर्क्युलट करणे. | **कार्यासन क्रमांक २०-अ-**<br>कार्यालयाचे क्र.पोमसं/२०-अे/३४-अे/क.वृ.प ५३/७२/२०१६-२२, मुंबई, **दि.१५/०९/२०२२** अन्वये, कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पुरविण्यात आलेल्या बंदोबस्ताच्या कालावधी समाप्त होताच तात्काळ कार्यमुक्त करणेबाबत घटक कार्यालय प्रमुखांना परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| २. | ५३ वी | **मुद्दा क्र.७**<br>महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना त्यांनी बजाविलेल्याउत्कृष्ठ कामगिरीकरिता वरिष्ठांकडून बक्षिस जाहीर केले जाते. तथापि, बक्षिस अनुदान पाहिजे तितके मंजूर होत नसल्यामुळे मागील २ ते ३ वर्षापासून बक्षिसांची रक्कम अधिकारी व अंमलदार यांना प्राप्त झालेली नाही. तरी, बक्षिस अनुदानामध्ये योग्य प्रमाणामध्ये वाढ व्हावी. | रा.रा.पो.बल तसेच इतर युनिटकडून बक्षिसाच्या किती रकमेची मागणी करण्यात आलेली आहे. बक्षिसाच्या १२ कोटी रकमेचे बिले प्रलंबित रक्कम अदा करणेकरीता मागणीसाठी प्रस्ताव शासनास पाठविण्यात येईल. सर्वांना बक्षिसांचे पैसे वेळेवर मिळणे आवश्यक आहे. | **कार्यासन क्रमांक ३३**<br>सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षात २०५५०१६८ जिल्हा पोलीस बल या उपलेखाशिर्षाखाली ०५ बक्षिस या उध्दिष्टामध्ये मूळ मंजूर अनुदान रु. ६.४४ कोटी इतके अनुदान मंजूर आहे. त्याअनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३३/७१२५/संकिर्ण२०५५०१६८/६/२०२२, दि.१४/०६/२०२२ व समक्रमांक दि. १५/०७/२०२२ अन्वये १००% अनुदानाची मागणी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने शासनाकडून जूलै ते डिसेंबर या महिण्यामध्ये रु. ५,१५,००,०००/- कोटी (८०%) इतके अनुदान प्राप्त झाले असून ते घटक कार्यालयांना वितरीत करण्यात आलेले आहे. | रु. ५,१५,००,०००/- कोटी (८०%) इतके अनुदान प्राप्त झाले असून ते घटक कार्यालयांना वितरीत करण्यात आलेले आहे.<br>तसेच १.२२ काटीची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे. प्राप्त होताच सर्व घटकांना वितरीत करण्यात येईल.<br>मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३. | ५३ वी | **मुद्दा क्र.९**<br>प्रत्येक पोलीस प्रशिक्षण केंद्रच्या रोड लगत शिल्लक जमीनीचा वापर लहान व्यवसायीक (मॉल) करिता उपयोग करण्यात यावा. जेणे करुन, प्रशिक्षणार्थी आणि सामान्य नागरिक दोघांना त्याचा उपयोग करता येईल आणि त्याचा नफा पोलीस प्रशिक्षण केंद्राला प्रगती कामी उपयोगात आणता येईल. | प्रस्तुत प्रकरणी, सदर मुद्याबात पुर्नविचार करुन शासनाची मान्यता घ्यावी लागेल. सदर शासनाच्या विचारधिन असल्याने, सदर प्रकरण इतके सोपे नाही. | **पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**<br>पोलीस प्रशिक्षण केंद्राच्या रोड लगत शिल्लक जमीन प्रशिक्षण केंद्राचे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कोणालाही व्यवसायीक तत्वावर देण्यात येऊ नये. असे या कार्यालयाचे दिनांक- २५/०१/२०२३ चे ज्ञापनान्वये सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्राना कळविण्यात आले आहे.<br>तरी, सदर मुद्या निकाली काढण्यात यावा, हि विनंती. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात येत** आहे. |
| ४. | ५३वी | **मुद्दा क्र.११**<br>अकोला जिल्हयातील तालुका व इतर पोलीस स्टेशन कार्यरत कर्मचारी यांचेकरिता सद्य:स्थितीत असलेले निवासस्थान अतिशय खराब झालेले आहे. तरी, नवीन शासकीय निवासस्थानाची निर्मिती केल्यास कर्मचारी यांचे अपडाऊन ब-याच प्रमाणात टाळता येईल व यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढीस लागेल. | अकोला ग्रामीण येथील निवासस्थानाबाबत अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. तसेच ज्या-ज्या जिल्हयामध्ये पोलीस निवासस्थान अतिशय खराब आहे. त्याबाबतची माहिती, अपर पोलीस महासंचालक (नियोजन व समन्वय), म. राज्य, मुंबई यांनी घेण्यात यावी. | **कार्यासन क्रमांक-२७**<br>राज्यातील १८७ पोलीस स्टेशन व निवासस्थान, ३०५ सेवा निवासस्थान आणि ४६ इतर प्रशासकीय इमारत बांधकाम प्राधान्यक्रम ठरवून प्राधान्यक्रमाची यादी मान्यतेसाठी या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/ २७/ १८७ पोस्टे. व निवा., ४६ इतर इमा-३०५निवा./सुधारीत प्राधान्यक्रम/ १३६/२०२३, दि.१७/०१/२०२३ चे पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेली होती. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, गृह विभाग यांचे क्र.बांधका-०१२३/प्र.क्र०५/पोल-७, दि.०७/०२/२०२३ चे पत्रान्वये सदर प्राधान्यक्रम यादीस मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात येत** आहे. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | | प्राधान्यक्रमाच्या यादीनुसार कार्यवाही करणेबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/२७/१८७ पोस्टे व निवा.,४६ इतर इमा-३०५ निवा. /सुधारीत प्राधान्यक्रम /१३६/२०२३, दि.१०/०२/२०२३ अन्वये पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांना कळविले आहे. सदर प्राधान्यक्रम यादीमध्ये अकोला जिल्यातील पोलीस अधिकारी व अंमलदार करिता सेवा निवासस्थान बांधकामाचा खालीलप्रमाणे समावेश केलेला आहे.:-<br>**(एकूण १५१७ निवासस्थाने)**<br><br>१. देवी पोलीस लाईन येथे ५३० निवासस्थाने- पोलीस अधीक्षक, अकोला<br>२. दक्षता नगर येथे ४६७ निवासस्थाने- पोलीस अधीक्षक, अकोला<br>३. पोलीस स्टेशन, बोरगाव करिता १३२ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक,अकोला<br>४. पोलीस स्टेशन, बाळापूर करिता-११४ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br>५. पोलीस स्टेशन, रामदास पेठ करिता९६ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br>६. वर्ग ३ ते वर्ग ४ कर्मचारीकरीता ८५ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br>७. पोलीस स्टेशन आकोट ग्रा.करिता ४६ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br>८. पोलीस स्टेशन, पातूर करिता २९ निवासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br>९. पोलीस स्टेशन, चान्नी करिता १८ निवसासस्थाने-पोलीस अधीक्षक, अकोला<br><br>ब) तसेच पोलीस स्टेशन, अकोट शहर, | |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तेल्हारा, हिवरखेड व दहिहांडा येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेकरिता १९८ निवासस्थान बांधकाम प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही या कार्यालयाच्या स्तरावर सुरु आहे. | |
| ५. | ५३वी | **मुद्दा क्र. १२**<br>सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ करिता गणवेष अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे. | शासनाकडून गणवेष अनुदान प्राप्त झाल्यावर अनुदान मिळणे बाकी असलेल्या कर्मचा-यांना वाटप करण्यात यावे. | **कार्यासन क्रमांक १८:-**<br>वित्तीय वर्ष सन २०२०-२०२१ व सन २०२१ -२०२२ चे संपुर्ण गणवेष भत्ता अनुदान वितरीत करण्यात आले आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| ६. | ५३ वी | **मुद्दा क्र.१४**<br>पोलीस विभागात तांत्रिक बाबींचा फार मोठा उपयोग आहे. त्यामुळे राज्यातील सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्र, सायबर गुन्हे, सीसीटीएनएस तसेच पोलीस विभागाकरिता निर्माण करण्यात आलेले विविध मोबाईल ॲपसंबंधी प्रशिक्षण आयोजित केल्यास त्याचा उपयोग दैनंदिन पोलीस स्टेशनचे कामकाजामध्ये उत्तमरित्या करता येईल. | आरपीटीआय च्या अभ्यासक्रमा-मध्ये समावेश करण्यात आलेला आहे. सीसीटीएनएस/सायबर याबाबतच्या तांत्रिक प्रशिक्षणासाठी तज्ञ पोलीस अधिकारी तसेच बाहेरच्या तज्ञ व्यक्तीची लेक्चरसाठी नेमणूक करणेबाबत अपोमसं (प्रशिक्षण) म. राज्य, मुंबई यांनी आवश्यक कार्यवाही करावी. | **पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**<br>तांत्रिक प्रशिक्षणासाठी बाहेरच्या तज्ञांना निमंत्रित करण्यात येईल. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| ७. | ५३ वी | **मुद्दा क्र.१६**<br>सद्य:स्थितीत कोव्हीड-१९ साथीमुळे राज्यभरातील पोलीस स्टेशन / शाखा येथील कर्मचारी यांना जास्त ताण सहन करावा लागत आहे. तसेच, त्यामध्ये पोलीस कर्मचारी यांचे मृत्यू होणे तसेच, सेवानिवृत्तीमुळे मनुष्यबळ कमी झालेले आहे. तसेच पोलीस भरतीची प्रक्रिया सद्य:स्थितीत स्थगीत आहे. त्यामुळे अतिशय कमी मनुष्यबळावर कर्मचारी यांनी आपले कामकाज करावे लागत आहे. करिता होणारी भरती प्रक्रिया प्रथम प्राधान्याने सुरु करण्यात यावी ही विनंती. | नवीन ७ हजार पोलीस शिपाई पदांची भरती होणार आहे. | **पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**<br>एकूण १८३३१ पदाची पोलीस भरती प्रक्रिया सुरु झाली आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| ८. | ५३वी | **मुद्दा क्र. १९**<br>राज्य राखीव पोलीस बल हे २४ तास रिजर्व्ह बल असल्याने, राज्य राखीव पोलीस बलाची विशेष पथकामध्ये गणना होत असल्याने, राज्य राखीव पोलीस बल हे सदैव बंदोबस्ताकरिता तत्पर असल्याने, ५०% विशेष प्रोत्साहन ज्यादा वेतन मिळावे. | अपोमसं, रा.रा.पो.बल म.राज्य, मुंबई यांचेकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. | **कार्यासन क्रमांक ३०**:-<br>या कार्यालयाचे ज्ञाप क्र. पोमसं/३०/ पो.क.वृं.प/ ५३वीसभा/ ११०/ २०२२, दि.**०८/०९/२०२२, दि.०२/११/२०२२ व** अन्वये, सदर मुद्याच्या अनुषंगाने अपोमसं, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांचेकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला असून, अद्याप अप्राप्त आहे. | सदर मुद्याबाबत पूर्तता करण्यात यावी. |
| ९ | ५३ वी | **मुद्दा क्र. २०**<br>पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक यांना सन १९७४ पासून स्पेशन डयुटी अलाऊन्स ही रक्कम रु. २०/- ( अक्षरी रुपये | सदर मुद्याबाबत, स्पेशन डयुटी तसेच इतर अलाऊन्समध्ये वाढ करण्यासाठी अभ्यास करुन शासनाला कसा प्रस्ताव पाठवता येईल ते पाहावे. वेगवेगळे | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>या कार्यालयाचे ज्ञापन क्र.पोमसं/३०/पो.क्र.वृं.प / ५३वी सभा /११०/२०२१, दिनांक ०२/११/२०२२ व दिनांक- ०८/०२/२०२३ अन्वये, | अपोमसं, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई यांनी याबाबत एक आठवडयात शिफारसीसह अहवाल सादर करावा. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | वीस फक्त ) ऐवढा भेटत आहे तो आज पावेतो तेवढाच आहे त्यात कोणताही बदल झालेला नाही. त्यात सुधारणा होणेस विनंती आहे. | अलाऊन्स एकत्रित जास्त रक्कम कशी मिळेल ते पहावे. तसेच पुढील वेतन आयोगासाठी याचा आभ्यास असायला हवा. | अपोमसं, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई यांचेकडून शिफारशी मागविण्यात आल्या आहेत. | |
| १० | ५३ वी | **मुद्दा क्र.२१**<br>गृहविभाग,शासन निर्णय युएनएफ/०२९३/४८३ (९१)/पोल-४, मंत्रालय, मुंबई, दि. १६/०९/२००५ यांचे आदेशाप्रमाणे सर्व पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना धुलाई भत्ता ही रक्कम रु. १००/- ( अक्षरी रुपये शंभर फक्त ) ऐवढा भेटत आहे तो आज पावेतो तेवढाच आहे त्यात कोणताही बदल झालेला नाही. त्यात सुधारणा होणेस विनंती आहे. | सदर मुद्याबाबत, स्पेशल डयुटी तसेच इतर अलाऊन्समध्ये वाढ करण्यासाठी अभ्यास करुन शासनाला कसा प्रस्ताव पाठवता येईल ते पाहावे. वेगवेगळे अलाऊन्स एकत्रित जास्त रक्कम कशी मिळेल ते पहावे. तसेच पुढील वेतन आयोगासाठी याचा आभ्यास असायला हवा. | **कार्यासन क्रमांक ३०**:-<br>या कार्यालयाचे ज्ञापन क्र. पोमसं/ ३०/ पो.क्र.वृं.प/ ५३ वी सभा/११०/२०२१, दि.०२/११/२०२२ व दि. ०८/०२/२०२२ अन्वये, अपोमसं, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांचेकडून शिफारशी मागविण्यात आल्या आहेत. | अपोमसं, रा.रा.पो.बल, म. राज्य, मुंबई यांनी याबाबत एक आठवडयात शिफारसीसह अहवाल सादर करावा. |
| ११ | ५३ वी | **मुद्दा क्र. २२**<br>पोलीस अंमलदार (ASI & HC = १०० / PN & PC = ८०) यांना रायफल भत्ता ( आर्म अलाऊन्स) हा रक्कम रु. १००/ ( अक्षरी रुपये शंभर फक्त ) ऐवढा भेटत आहे. तो आज पावेतो तेवढाच आहे. त्यात कोणताही बदल झालेला नाही त्यात सुधारणा होणेस विनंती आहे. | सदर मुद्याबाबत, स्पेशन डयुटी तसेच इतर अलाऊन्समध्ये वाढ करण्यासाठी अभ्यास करुन शासनाला कसा प्रस्ताव पाठवता येईल ते पाहावे. वेगवेगळे अलाऊन्स एकत्रित जास्त रक्कम कशी मिळेल ते पहावे. तसेच पुढील वेतन आयोगासाठी याचा आभ्यास असायला हवा. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>या कार्यालयाची ज्ञाप क्र. पोमसं/ ३०/पो.क्र.वृं.प/५३ वी सभा/११०/२०२१, दि.०२/११/२०२२ व दि.०८/०२/२०२३ अन्वये, अपोमसं, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांचेकडून शिफारशी मागविण्यात आल्या आहेत. | तांत्रिक मुद्दा आहे.<br>सदरबाबत पुढे सातत्याने पाठपुरावा चालू ठेवण्यात यावा. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १२ | ५३ वी | **मुद्दा क्र.२३**<br>७ वा वेतन आयोग हा दि. ०१/०१/२०१६ पासून लागू करण्यात आलेला आहे. परंतू शहर पुरक भत्ता ( C.L.A.) अद्यापही ५ व्या वेतन आयोगानुसार मिळत आहे. तरी, हा भत्ता ७ व्या वेतन आयोगानुसार लागू करुन, फरकाच्या रक्कमेसह देण्यात यावे. | **अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) म. राज्य, मुंबई-** CLA ७ व्या वेतन आयोगानुसार का मिळत नाही. याबाबत शासनाला प्रस्ताव पाठविण्यात यावा. तो मिळण्यासाठी काय प्रयत्न केले. माहिती घेऊन पुढील वृंद परिषदेमध्ये कळवावे. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने अपोमसं, रारापोबल, म. राज्य, मुंबई यांचेकडून कार्यालयीन दिनांक **०२/११/२०२२ व दि.०८/०२/२०२३** च्या ज्ञापान्वये शिफारशी मागविण्यात आलेल्या आहेत. तथापि, प्रस्तुत प्रकरणी अद्याप अहवाल अप्राप्त आहे. | सदरबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.<br>त्यामुळे सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| १३ | ५३ वी | **मुद्द क्र.२५**<br>PSI / ADD.SP दर्जाच्या अधिका-यांच्या गणवेष भत्त्यामध्ये वाढ करण्यासंदर्भात अधिका-यांनी वारंवार पाठपुरावा करुनही, अद्यापपर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. याबाबत शासनाकडे पाठपुरावा होणेस विनंती आहे. | प्रस्तुत प्रकरणी, शासनाला प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. पाठपुरावा करण्यात यावा. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>शा.नि.क्र. एम.आय.एस-१३१६/ प्र.क्र.२५०/पोल-४,दि.०५/०१/२०२३ अन्वये PSI ते Addl SP. यांचे गणवेष अनुदान प्रतिवर्षी रु.६०००/- इतके मंजूर झालेले आहेत. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| १४ | ५३ वी | **मुद्दा क्र.२७**<br>महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी / अंमलदार शासकीय कामाकरिता जाताना, एसटी बसचे वॉरंट देण्यात येतात. परंतू सदर वॉरंट हे शिवशाही बसमध्ये ग्राह्य नसल्याने, अंमलदार यांना विनाकारण ताटकळत रहावे लागते. सध्या महाराष्ट्रामध्ये जलद बसपेक्षा शिवशाही बसचे प्रमाण अधिक असल्याने, अधिकारी व अंमलदार यांना प्रवास करतांना अडचणी निर्माण होतात. त्यामुळे पोलीस विभागाकडून देण्यात येणारे वॉरंट शिवशाही बसमध्ये ग्राह्य | प्रलंबित असलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाला स्मरणपत्र पाठविणे. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाचे ज्ञापन क्र. पोमसं/३०/कर्मचारी वृंद परिषद/५० वी सभा/२३०/२०१८, दिनांक **०८/०९/२०२२** अन्वये, शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आलेली आहेत. | **निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | करण्यात यावे. जेणेकरुन, अंमलदार यांना प्रवास सुखकर व सोयीचा होईल. | | | |
| १५ | ५३ वी | **मुद्दा क्र. २८**<br>महसुल खाते आणि पोलीस विभाग हे एकाच संवर्गातील समकक्ष पदे आहेत. परंतू पोलीस विभागातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना महसुल खात्याप्रमाणे वेतन मिळत नाही. पूर्वी पोलीस विभाग व महसुल विभाग यांचे वेतन समान होते, परंतू ०६ व्या वेतन आयोगापासून पोलीस विभाग व महसुल विभाग यांच्या वेतनामध्ये तफावत निर्माण झाली आहे. ही तफावत दिवसेंदिवस वाढतच चालली आहे. महसुल विभागाला सर्व शासकीय सुट्टया, सर्व धार्मिक सण कुटूंबासोबत उपभोगता येतात. याऊलट पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय सुट्टया मिळत नाहीत. महसुल विभागापेक्षा जास्त वेळ काम करुनही एकच संवर्ग असूनही महसुल विभागापेक्षा पोलीस विभागाला कमी वेतन देण्यात येत आहे. त्यामुळे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांच्या मनावर विपरीत परिणाम होऊन, न्युनगंड निर्माण होत आहे. ०७ व्या वेतन आयोगामध्ये महसुल विभागाप्रमाणे वेतन करणेबाबतच्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. तरी,पोलीस | सदर प्रकरणी, पुढील वेतन आयोगामध्ये समितीसमोर वृंद परिषदेचे मार्गदर्शन घेण्यात येईल. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>मा. अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार पुढील वेतन आयोगामध्ये मार्गदर्शन घ्यावयाचे असल्याने पुढील वेतन आयोगाकरिता नेमण्यात येणा-या वेतन त्रुटी समितीसमोर सदर मुद्दा मांडण्यात येईल.<br>सद्यस्थितीतकोणतीही कार्यवाही नाही. | राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ अहवाल खंड-२ मधील वेतनश्रेणीविषयक व आनुषंगिक स्वीकृत करण्याबाबत दि. १३/०२/२०२३ शासन निर्णय अन्वये निर्गमित करण्यात आले आहे.<br>सदर शासन निर्णयाचे कार्यासन क्र. ३० यांनी आपली शिफारस काय होती आणि बक्षी समितीने निर्णय काय दिला ? याबाबत सविस्तर अभ्यास करुन त्यासंदर्भातील सर्व मुदेनिहाय टिप्पणी अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्या मार्फतीने नस्तीवर सादर करावे. |

| अ.क्र | सभा | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | विभागाला महसुल खात्याप्रमाणे वेतन मिळाले तर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे मनोबल उंचावून कार्यक्षमतेत वाढ होऊन, कार्यकुशलता वाढेल. | | | |
| १६ | ५३ वी | **मुद्दा क्र.२९**<br>पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उप निरीक्षक पर्यंतच्या पर्यंतच्या सर्व पोलीस अंमलदार यांना किट संरजाम खरेदी करिता दरवर्षी रु. ५१६७/- दिले जातात. तर पोलीस अधिकारी यांना गणवेश अनुदान ०४ वर्षातून एकदा रु. ५०००/- दिले जातात. राज्य राखीव पोलीस दलातील पोलीस अधिकारी यांना विशेष सन्मान गार्ड, राज्याबाहेरील बंदोबस्त, नक्षल डयुटी, विविध प्रशिक्षणे, राज्य व राज्याबाहेरील वेगवेगळया परेड तसेच वेगवेगळया उपक्रमांमध्ये वेगवेगळे गणेवश परिधान करावे लागतात. तरी, पोलीस अंमलदार यांचे प्रमाणेच पोलीस अधिकारी यांनाही दरवर्षी रु. ५०००/- किंवा ०४ वर्षातून एकदा रु. १६०००/- गणवेश अनुदान मिळावे. | प्रस्तुत प्रकरणी, प्रतिवर्षी रु. ६०००/- गणवेष अनुदान मिळावे. याकरीता शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येईल. | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>शा.नि.क्र.एम.आय.एस-१३१६/ प्र.क्र.२५०/पोल-४,दि.०५/०१/२०२३ अन्वये PSI ते Addl SP. यांचे गणवेष अनुदान प्रतिवर्षी रु.६०००/- इतके मंजूर झालेले आहेत. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

## ५३ व्या राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले नवीन मुद्दे

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| १ | **५३ वी** | MPAIS संगणक प्रणाली बंद आहे, ती सुरु करणे आवश्यक आहे. | ऑनलाईन सिस्टिम कायमस्वरुपी सुर राहण्यासाठी अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल. | **संगणक शाखा, पोमसं, कार्यालय-**<br>सदर मुद्यास अनुसरुन, कळविण्यात येते की, MPIAS संगणक प्रणालीची अंमलबजावणीचे कामकाज संचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे यांचे कार्यालयाकडून करण्यात येत होते.<br>परंतु, मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशान्वये सदरची संगणक प्रणाली पुढील आदेशापर्यंत बंद करण्यात येत असल्याचे बिनतारी संदेश विभाग, म.राज्य पुणे यांचे पत्र क्रमांक Plannig/MPIAS Discontinuation /२७३/२०२०, दि.११/०८/२०२० अन्वये या कार्यालयास कळविले आहे. | ई-ऑफीस संगणक प्रणाली राज्यातील काही घटकात सुरु असून सदर संगणक प्रणालीचा सर्व घटकांनी त्यांचा अवलंब करुन दैनंदिन कार्यालयीन कामकाजात त्याचा उपयोग करण्याबाबत परिपत्रक काढुन सर्व घटकांना निर्गमित करणे. |
| २ | **५३ वी** | १९८३ च्या नियमानुसार घटक स्तरावर प्रत्येक ३ महिन्यांनी वृंद परिषद होणे आवश्यक आहे. | पोमसं कार्यालयाकडून सर्व घटक कार्यालयांना ३ महिन्यांनी कर्मचारी वृंद परिषद घेणेबाबत कळविण्यात येईल व तसे परिपत्रक काढण्यात येईल. पूर्तता अहवाल पोमसं कार्यालयाकडून घेण्यात येईल. | **कार्यासन क्र. १६**<br>कार्यालयाचे क्र.पोमसं /१६/३६९९/ क.वृं.प-५३ वी सभा/४८/२०१६, दिनांक ०७/०६/२०२२ अन्वये गृह विभाग शासन निर्णय सन १९८३ नुसार घटक कार्यालयांनी त्यांच्या स्तरावर पोलीस कर्मचारी वृंद परिष्देची तीन महिन्यातून एकदा सभा घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून, त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल कार्यालयास सादर करण्यास कळविले आहे. | सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तसेच कर्मचारी वृंद परिषद आयोजित केल्याबाबतचा पूर्तता अहवाल सादर करणेबाबत दि.१६/०२/२०२३ अन्वये पुन्हा घटकांना कळविण्यात आले आहे. | |
| ३ | ५३ वी | निवडणूक डयुटी बजाविलेल्या Flying Sqad मधील कर्मचा-यांना निवडणूक भत्ता मिळत नाही. तो मिळणे आवश्यक आहे. | मुद्यांची नोंद घ्यावी. पुढच्या वेळी त्यांना पण निवडणुक भत्ता मिळणे आवश्यक आहे. | **<u>कार्यासन क्र. २१</u>**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, आगामी लोकसभा/विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचे कामकाजासाठी परिश्रमिक मानधन मंजूर करणेबाबत प्रशासकीय मंजूरीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास त्यांच्या अधिनस्त Flying Sqad मधील प्रत्यक्ष निवडणूक कामकाजाशी संबंधित कर्तव्य बजावलेले पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच घटक स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या निवडणूक कक्षातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे नावाचा समावेश करुन एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्याकरिता सर्व पोलीस घटक प्रमुख यांना या कार्यालयास सादर करण्याबाबत दि.२०/०९/२०२२ च्या पत्रान्वये सूचित केले आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने **मुद्दा निकाली काढण्यात** येत आहे. |
| ४ | ५३ वी | प्रशासन उत्तम चालविल्याबद्दल तसेच Zero Pendency बद्दलच्या पुरस्काराची रक्कम वाढविणे आवश्यक आहे. | Point Noted/ विचार करु. | **<u>कार्यासन क्रमांक-३१</u>**<br>शासन निर्णय क्र. एडब्ल्युडी-०११५/ प्र.क्र.२६८/पोल-१४, दि.२९/११/२०१८ अन्वये मुंबई पोलीस नियमावलीच्या नियम ३०० अन्वये पोलीस निधीतून द्यावयाच्या बक्षीसकरिता मार्गदर्शक सूचना आणि आर्थिक मर्यादेमध्ये | सदर मुद्याबबत, योजना ही उत्कृष्ट घटक व उत्कृष्ठ पोलीस स्टेशन येथे आधिच कार्यन्वित करण्यात आले आहे. त्यामुळे सदर **मुद्दा निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | सुधारणा करण्यात आल्या आहेत.<br>प्रस्तुत शासन निर्णयामध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट कार्य करणे, पोलीस बंदोबस्त, परेड तसेच, गुन्हयाचे शोधकार्य, तपासणी इत्यादी करिता पोलीस महासंचालक, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) महराष्ट्र राज्य मुंबई व पोलीस घटक प्रमुखांना आर्थिक मर्यादेत बक्षिस मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. | |
| ५ | **५३ वी** | एसआरपीएफ मधील राखीव पोलीस उपनिरीक्षक पदाचा Black Belt चा रंग Brown असण्याबाबत. | याबाबत, अभ्यास करण्यात येईल. | **कार्यासन क्रमांक-१८**<br>दि.२८/०७/२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने **मुद्दा निकाली काढण्यात येत आहे**. |
| ६ | **५३ वी** | पोहवा/७७९,श्री. प्रशांत वासुदेव पाटील, अकोला-२०१५ पासून CCTNS प्रणालीबाबत विरिष्ठ कार्यालय तसेच पोलीस स्टेशन साहित्य पुरविण्यात आले आहे. परंतु सदर साहित्याची सध्य परिस्थिती अत्यंत खराब आहे. संगणक वारंवार दुरुस्ती करुनही बंद पडत आहे. | मुद्या बरोबर आहे. नवीन Software/hardware घेण्याबाबत HPC ची मंत्रालयामध्ये मीटींग इ ाालेली आहे. पाठपुरावा चालु आहे. कार्यवाहीला वेळ आहे. | **कार्यासन क्र.-१७**<br>स्टेट ॲपेक्स कमिटी व स्टेट एम्पॉर्ड कमिटी या दोन्ही बैठकीमध्ये Operating System Upgradation बाबत चर्चा झाली असून त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आलेले आहे.:-<br>दिनांक १०/०५/२०२२ रोजीच्या स्टेट ॲपेक्स कमिटीमधील मुद्दा क्र. D-Hardware Procurment मधील | सदर मुद्दा **निकाली काढण्यात येत** आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Decision Taken मध्ये SAC approved and recommended the procurement of hardware from DGP office from modernization fund post on boarding of vender for CCTNS २.O RFP असे आदेशीत केले आहे. तसेच शासनाच्या दिनांक २०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सीसीटीएनएस प्रकल्पाच्या NON CAS प्रणाली विकसीत करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या प्रक्रियेमध्ये नवीन सिस्टीम इंटीग्रेटर नेमणूक होताच त्यांनी सादर केलेले तांत्रिक विनिर्देशानुसार सगंणक हार्डवेअर खरेदी करण्यात येणार आहे. त्याकरीता आवश्यक संगणक हार्डवेअर खरेदीकरीता पोलीस आधुनिकीकरण सन २०२१-२२ योजनेअंतर्गत मंजूरी प्राप्त आहे. | |
| **७** | **५३ वी** | अमरावती ग्रामीण घटकामध्ये सन **२०१८ ते २०२१** या कालावधीत एकूण १२ पोलीस अंमलदार अपघातामध्ये मरण पावलेले आहेत त्यांना विमा संचालनालय, बांद्रा, मुंबई येथील कार्यालयाकडून विमा रक्कम मिळत नाही. तसेच वारंवार त्रुटी काढण्यात येत आहे. | पोमसं कार्यालयाने परिपत्रक निर्गमित करावे की, वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक असून तो वेळेत नुतणीकरण करण्यात यावा अन्यथा विमा रक्कम मिळण्यास अडचणी येत असून, विमा रक्कम मिळणार नाही. | **कार्यासन क्रमांक २८-अ**<br>सदर मुद्यांच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचा-यांकरिता दरवर्षी समूह व्यक्तीगत अपघात विमा योजना लागू झाल्यानंतर त्याबाबत सर्व घटक कार्यालयांना पोमसं कार्यालयाकडून कळविण्यात येते. त्याच ज्ञापनामध्ये सर्व घटक कार्यालयांना त्यांच्या अधिपत्याखाली सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना चालक परवाना (चालक परवाना) अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्याबाबत कळविण्यात येते. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | तसेच **विमा कंपनीकडे सादर करावयाची कागदपत्रे** यामध्ये देखील वैध वाहन परवाना यांचा समावेश करण्यात येतो. | |
| **८** | **५३ वी** | पोलीस विभागातून सेवानिवृत्तीनंतर कर्मचा-याला MPKAY योजनेचा लाभ तो हयातील असेपर्यंत लाभ मिळणेबाबत. | सदर बाबत महात्मा फुले आरोग्य योजनेमध्ये समावेश करणेबाबत विचार चालु आहे. त्याबाबत वित्त विभाग व गृह विभाग यांच्यामध्ये प्रिमियम भरण्याबाबत चर्चा चालू आहे. त्यबाबत निर्णय होईल. | **कार्यासन क्रमांक २८-अ**<br>महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व सेवानिवृत्त पोलीस कर्मचा-यांना (पोशि ते स.पो.उप.नि) लागू करणेबाबत या कार्यालयाचे क्र. पोमसं/२८-अे/४९३७/फुले जन आरोग्य योजना/२०/२०१७, दि.२०/०२/२०१७ चे पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. तद्नंतर या कार्यालयाचे समक्रमांक, दि.१६/०५/२०१७, दि.२१/०५/२०१८, दि.२२/०१/२०१९, दि.०८/०२/२०१९, दि.१९/०३/२०१९, दि.०७/१०/२०१९, दि.२४/०७/२०२० व दि.२४/०५/२०२१ चे पत्रान्वये शासनाने वेळोवेळी विचारणा केलेली माहिती सादर करण्यात आलेली आहे. आणि या कार्यालयाचे समक्रमांक दि.१०/११/२०१७, दि.०६/०३/२०१८ व दि.०९/०६/२०२१ ची अ.शा.पत्रे शासनास पाठविण्यात आलेली आहे.<br>तथापि, सदर प्रकरणी शासनाचे आदेश अद्याप अप्राप्त आहे. | महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व सेवानिवृत्त पोलीस कर्मचा-यांना (पोशि ते स.पो.उप.नि) लागू करणेबाबत शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाठपुरावा करावे. |
| **९** | **५३ वी** | डायल ११२ साठी कर्मचा-यांची आवश्यक्ता असुन कर्मचारी संख्या कमी पडतआहे. होमगार्ड पुरविले तरी मदत होऊ शकते. | होमगार्डची १८० दिवस मदत घेता येऊ शकते. नवीन भरती मधून डायल-११२ साठी कर्मचारी उपलब्ध होतील. | **कार्यासन क्रमांक २०-अे-**<br>सदर प्रकरणी वाहन चालकांच्या कमतरतेमुळे "डायल-११२" या प्रकल्पासाठी तात्पुरत्या स्वरुपात वाहन | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने **मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | तसेच डायल- ११२ साठी गाडया पुरविणेसाठी शासनाकडे पाठपुरावा करणे. | चालकाची नेमणूक करावयाची असल्याने, त्यांच्या आस्थापनेवरील परवानाधारक व पारंगत होमगार्ड वाहन चालकांची जिल्हानिहाय सविस्तर माहिती (नांव, हुद्या, परवाना क्र.) या बाबतची माहिती पाठविणेबाबतचे पत्र महासमादेशक होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि.१४/१०/२०२२ अन्वये पत्र पाठविले आहे. | |
| १० | ५३ वी | कायदा सुव्यवस्था व तपासयंत्रणा स्वतंत्र करणेबबात. | मुद्दा बरोबर आहे. कोर्टाचे पण तसे आदेश आहेतच. सध्या क्राईम आणि का. व सु. साठी अधिक मनुष्यबळ लागेल. **(कार्यासन क्रमांक २६-ब** | कायदा सुव्यवस्था व तपासयंत्रणा स्वतंत्र करणेबबात घटकप्रमुखांना निर्गमित करावयाच्या परिपत्रकावंर विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सू.) यांची स्वाक्षरी झाली असून सदर नस्ती अवलोकनार्थ मा. पोलीस महासंचालक यांच्याकडे सादर करण्यात आली आहे. | कायदा सुव्यवस्था व तपासयंत्रणा स्वतंत्र करणेबबात घटकप्रमुखांना निर्गमित करावयाचे परिपत्रक तातडीने परिपत्रक निर्गमीत करावे |
| ११ | ५३ वी | एसआरपीएफ भरतीसाठी उंची १६८ सेमीची अट आहे. परंतु एसआरपीएफ साठी जे एसेम्बल वाहन मिळालेले आहे त्यामध्ये १६८ सेमी उंचीचा जवान व्यवस्थित बसु शकत नाही.किमान १५० किमीच्या पुढे प्रवास करावा लागतो. तरी, टाटा कंपनीची जी स्टारबस आहे त्यासारख्या अजुन बस मिळाल्या तर सोयीस्कर होईल. | मुद्दा नोंद करुन घ्या. अपोमसं(रा.रा.पो.बल), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अभिप्राय मागवा. | **कार्यासन क्रमांक-१७**<br>अपर पोलीस महसंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.अपोमसं/रारापोबल/०२/ वाहने संकिर्ण-२०२१/२८/२०२१/२७३८, दि.१९/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस अंमलदार यांची उंची १६८ सेमी व त्यापेक्षा जास्त आहे. त्यामुळे त्यांना असेंबल करण्यात आलेल्या वाहनांना लांबचा प्रवास करण्यास त्रास होतो. | सन २०१८-१९ च्या निर्लेखित वाहनाच्या बदली नविन बस खरेदी करतांना बसमध्ये कर्मचारी उभा करुन तपाण्यात आले आहे त्यामुळे यापुढे अशी अडचण निर्माण होणारनाही. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | याकरिता पोलीस अंमलदार यांना लांबचा प्रवास करतांना होणारा त्रास टाळण्यासाठी आरामदायी बस उपलब्ध करुन दिल्यास सोईचे होईल. असे नमूद केले आहे.<br>तसेच, वार्षिक योजना सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात मागणी क्र.बी-१ "२०५५ पोलीस २०५५ ०५१५(००)(०९) जिल्हा पोलीस बल(कार्यक्रम)-५१ मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली व मागणी क्र.बी-१"२०५५ पोलीस २०५५ ०६४२(००)(१३) जिल्हा नक्षल विरोधी कार्यक्रम (कार्यक्रम), ५१-मोटार वाहने" या लेखाशिर्षाखाली या राज्य पोलीस दलाकरिता नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध होवून मिळणेबाबत दि.०७/०६/२०२२ रोजी शासनास दोन्ही प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावामध्ये बस खरेदी प्रस्तावीत करण्यात आली आहे. परंतु सदर प्रस्तावांना अद्याप प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली नाही.<br>सदर प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदरची वाहने खरेदी करणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास मंजूरी मिळाल्यानुसार M/S Mahindra कंपनीच्या ३३ नग बस खरेदी करण्यात आल्या आहेत. तसेच, सन२०१६-१७ व | |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २०१७-१८ या वित्तीय वर्षात निर्लेखित झालेल्या वाहनांच्या बदली नवीन वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानुसार खरेदी प्रक्रिया सुरु आहे. | |
| १२ | **५३ वी** | पोलीस कल्याण पाल्यासाठी असलेल्या ५ टक्के आरक्षणाचा लाभ पोलीस कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीनंतर म्हणजे ५८ वयानंतर प्रमाणपत्र दिले जाते. परंतु तोपर्यंत पोलीस पाल्य ३५ वयोमर्यादा ओलांडत असते तरी सदरचे प्रमाणपत्र वयाच्या ५० किंवा ५५ वयानंतर मिळणे आवश्यक आहे. | मुद्या नोंद करुन घ्या. पुढच्या वेळी याचा रिप्लाय द्या. | **कार्यासन क्रमांक ४४-**<br>सदर मुद्याच्या अनुसरुन, शासन निर्णय गृह विभाग लवेसु-३६१/प्र.क्र.२३८/पोल-५अ/ दि.२२/०८/२०१४ अन्वये पदवीधर अंशकालीन उमेदवारांसाठी लागू असलेल्या १० समांतर आरक्षाणामधून ५ टक्के आरक्षण खालीलप्रमाणे राखीव ठेवण्यात आले आहे.:-<br>अ) अंशकालीन पदवीधरांसाठी राखीव समांतर आरक्षणापैकी ३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील अंमलदारांच्या पाल्यांसाठी पोलीस भरतीत राखीव ठेवण्यात आले आहे.<br>ब)तसेच अंशकालीन पदवीधरांसाठी राखीव समांतर आरक्षणापैकी २ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील शासन सेवेत कार्यरत असताना अकाली निधन झालेल्या अंमलदारांच्या पाल्यासाठी अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.<br>शासन निर्णय क्र.पोलीस-१८१५ /प्र.क्र.३०६/पोल-५अ, दि.१६/०२/२०१६ शासन आदेश पत्रान्वये अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांना ३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-याच्या पाल्यासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. तसेच सदर सवतलत ही गट क व | **सदर मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | गट ड संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचा-यांच्या पाल्यांना लागू राहील असे कळविले आहे.<br>अभिप्राय- उपरोक्त शासन निर्णय दि.२२/०८/२०१४ व त्याबाबतचे स्पष्टीकरण पत्र सदर्भ दि.१६/०२/२०१६ नुसार आरक्षणाची तरतुद फक्त नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त व अकाली मृत्यु पावलेल्या अंमलदाराच्या फक्त एका वारसासाठी आहे. त्यामुळे असे प्रमाणपत्र सेवानिवृत्त होण्यापूर्वी देणे संयुक्तीक होणार नाही. | |
| **१३** | **५३ वी** | कर्मचारी वृंद परिषदेची कमिटी मागील वर्षी स्थापन झाली आणि मिटींग यावर्षीपासून सुरु झाली आहे,आपला २ वर्षाचा कालावधी असतो. ६ महिनेप्रमाणे ४ मीटींग होतात. तरी १ ली मीटींग आज झाली आहे, त्यामुळे आजपासून पुढील २ वर्षे गणण्यात यावे ही विनंती. | काही हरकत नाही.<br>(अपोमसं प्रशासन) | **कार्यासन क्रमांक १६**<br>या कार्यालयाचे ज्ञापन दि.०७/०६/२०२२ अन्वये, घटक प्रमुखांना त्यांच्या स्तरावर पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची तीन महिण्यातून एकदा सभा घेण्यातबबत कळविण्यात आले आहे. | विचार करुन निर्णय घेण्यात येईल. |
| **१४** | **५३ वी** | प्रशिक्षण केंद्र मे जो DI रहते थे उनको एक टप्पा पदोन्नती मिलती थी, बाद मे पदोन्नती रद्द करके ३० टक्के अतिरिक्त वेतन दिया करते थे.अब ७ वेतन आयोग मे ३० टक्के अतिरिक्त वेतन भी बंद कर दिया ह | सदर बाबत शासन होईल, त्यामध्ये १२ टक्के अतिरीक्त वेतन मिळेल | **कार्यासन क्रमांक ३०-**<br>शासन निर्णय गृह विभाग क्र.पोलीस-१८१५/प्र.क्र.५४/पोल-५अ, दि.१६/०१/२०२३ अन्वये प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रतिनियुक्तीने असणा-या प्रशिक्षकांना मुळ वेतनाच्या १२ टक्के अतिरिक्त वेतन(प्रशिक्षण भत्ता) मंजूर | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | करण्यात आला आहे. | |
| १५ | ५३ वी | हर मुख्यालय तथा प्रशिक्षण केंद्र मे सौर उर्जा प्रकल्प किये तो बिजली बिल बहुत कम होगा. नागपूर PTS मे ३ लाख तक था PTS धुळे मे १.५ लाख तक बिल आता है, तो बिल कम हो जायेंगे. | Note करुन घ्या **(कार्यासन क्रमांक २७)** | **पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई** प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे यांचेशी संपर्क साधून सौर उर्जा प्रकल्पाबाबत माहिती घेऊन संबंधित जिल्हाधिकारी हयांना विनंती करुन DPDC अंतर्गत निधी मंजूर करुन घेऊन सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये सौर उर्जा प्रकल्प राबविण्याबाबत सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र यांना सुचना देण्यात आल्या आहेत. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| १६ | ५३ वी | नवप्रविष्ठ प्रशिक्षणार्थी मे जो First, second,Third ग्राऊंड वर्क मे आते है उनको कवायत निदेशक के लिए चुना जाए. इनको ३ साल के अंदर मे प्रशिक्षण के भेजा जाए, इससे इमको कवायत निदेशक जल्दी मिलेंगे, क्योकी ३ साल सर्व्हिस करने के बाद कोई भी प्रशिक्षणार्थी कोर्स नही करना चाहते. | अपोमसं (प्रशिक्षण व खास पथके) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिप्राय सादर करावा. | **पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई** सदर मुद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कवायत निदेशक बाबतच्या सर्व अटींचे पुर्नपरिक्षण करुन पोमसं यांच्या मान्यतेस्तव पाठविण्यात येईल. | पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) यांनी याबाबत सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा. |
| १७ | ५३ वी | -हदयविकार पेशंटसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून २ रुग्णालयाची शिफारस/नावे पाठविण्यात आलेली आहेत त्यास पोमसं कार्यालयाकडून मान्यता मिळावी, कारण पॅनलवरील रुग्णालय त्यांची बिल रक्कम न मिळाल्यामुळे पेशंटवर उपचार करत नाही. | नवीन रुग्णालयांना मान्यता देणेबाबत बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येईल. तसेच बिल न मिळाल्यामुळे जे रुग्णालय पेशंटवर उपचार करत नाही त्यांच्यावर कारवाई करा. | **कार्यासन क्र.२८** १. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर खाजगी रुग्णालयांची निवड करणेबाबत दि.२६/०७/२०२२ व दि.१५/०९/२०२२ रोजी निवड समितीच्या पार पडलेल्या बैठकीमध्ये पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून शिफारस करण्यात आलेल्या रुग्णालयांच्या नावांचा विचार करण्यात आला आहे. | उपस्थित केलेल्या मुद्दयाच्या अनुषंगाने पुर्तता झाल्याने मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |

| अ.क्र. | सभा | आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश | संबंधीत कार्यासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती | मा.अध्यक्षांचे आदेश/निर्देश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | २. रुग्णालयाचे बील अदा न झाल्याचे कारणावरुन रुग्णावर उपचार करण्यास नकार देत असलेल्या CHL Hospital,Chandrapur या रुग्णालयास पॅनलवरुन कमी करण्यात आले आहे.<br>३. सध्या चंद्रपूर जिल्हयात खालील ०६ रुग्णालये महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचया पॅनलवर कार्यरत आहेत:-<br><br>१) Dualewar Accident Fracture & Backipam cline, Hospital.<br>२) Christ Hospital<br>३) Coal City Hospital.<br>४) Susrusha Surgical Maternity Fracture and Accident Hospital.<br>५) Astha Critical Care Multispeciality Hospital, Bramhapuri<br>६) Ashtha Hospitaal. | |

******

# राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद - ५४ वी सभा. (नवीन मुद्दे)

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| १. | मपोह/२०५० कौशल्या प्रभु रांजणे नेम. विशेष शाखा, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना ट्रॉन्सफर T.A. ६ व्या वेतन अयोगाप्रमाणे मिळतो. तो ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळाला पाहिजे. | **कार्यासन क्र. ३०**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.३०/११/२०२२ च्या ज्ञापनान्वये (प्रत संलग्न) पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहे. | सदरबाबत सर्वसमावेशक प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी याबाबत पाठपुरावा करावा. |
| २. | मपोह/२०५० कौशल्या प्रभु रांजणे नेम. विशेष शाखा, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना १५ दिवसाचे रोखीकरण हे ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळते. तो ७ व्या वेतन आयोगाचे वेतनाप्रमाणे दयावे. प्रति कर्मचारी ३ ते ५ हजार रु. कमी मिळत आहे. | **कार्यासन क्र. ३०**<br>या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३०/अर्जित रजा प्रत्यार्पण-रोखीकरण/पोलीस दल/१५०/२०१९, दिनांक ०२/११/२०१९ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता, शासनाने दि.०७/०९/२०२२ च्या पत्रान्वये केंद्रातील पोलीस अधिकारी व इतर राज्यातील पोलीस अधिकारी यांचेबाबतीत ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार रजेचे रोखीकरणाच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात येते याचा तुलनात्मक अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाच्या दि.१४/०९/२०२२ च्या पत्रान्वये पोलीस महासंचालक, गुजरात/कर्नाटक व महासंचालक, बीएसएफ/सीआरपीएफ आणि पोलीस आयुक्त, नवी दिल्ली यांना पत्रे पाठविण्यात आलेली आहेत. माहिती प्राप्त होताच शासनास सादर करण्याची तजवीज ठेवली आहे. | सदरबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांनी याबाबत पाठपुरावा करावा. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| ३. | मपोह/२०५० कौशल्या प्रभु रांजणे नेम. विशेष शाखा, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर/ पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबइ | पोलीस दलातील विहित शारिरीक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी प्रोत्साहन भत्ता २५०/- रुपये प्रती माह मिळतो. त्यात वाढ होवून २०००/- रुपये पर्यंत मिळणेस विनंती आहे. | **कार्यासन क्र. ३०**<br>राज्य पोलीस दलातील विहित शारीरिक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक) यांना शासन निर्णय, गृह विभाग, क्र.पीडब्ल्यूएफ१२०४/१४३/प्र.क्रपोल-७, दि.०६/११/२००६ अन्वये प्रतिमाह रु.२५०/- प्रमाणे मासिक प्रात्साहन भत्ता अनुज्ञेय आहे.<br>सदर भत्त्यात वाढ करुन तो रुपये १,०००/- करण्याबाबत या कार्यालयाचे क्रमांक पोमसं/३०/बीएमआय/पो.अधि./कर्म.१३३/२०२१, दिनांक-१६/०९/२०२१ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून, त्याबाबतचे शासन आदेश अद्याप अप्राप्त आहेत. | शासनास पाठविलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाठपुरावा करणे. |
| ४ | श्री. व्यंकट माधवराव केंद्रे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. जिस्नी, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | इतर शासकीय कर्मचा-यांना ५ दिवसाचा आठवडा कामाचे तास ८ तास असतांना पोलीसांना १० तासापेक्षा जास्त कर्तव्य करावे लागते त्याचा विचार करुन १ महिन्याचा अतिरिक्त पगार देण्यात यावा. | **कार्यासन क्र.३०**<br>या कार्यालयाचेपत्र क्र.पोमसं/३०/पोलीस अंमलदार/प्रोत्साहन भत्ता/१६०-२०२१, दि.११/११/२०२२ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यावरील शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत. | सदरबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे .<br>तसेच पोलीसांची डयुटी शिफ्टमध्ये असल्याने हे शक्य होणार नाही. शासनाने दि. च्या शासन निर्णयान्वये २० दिवस नैमित्तीक रजा केली आहे. |
| ५ | श्री. व्यंकट माधवराव केंद्रे, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. जिस्नी, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | सन २००५ नंतर सेवेत भरती झालेले सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना न्यायालयीन कर्मचा-यांप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करावी. | **कार्यासन क्र.३०**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.३०/११/२०२२ च्या ज्ञापनान्वये पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहे. | जुनी पेन्शन ही बाब केंद्राचा विषय असून, त्यात काही भाष्य नाही.<br>त्यामुळे सदर मुद्दा **निकाली काढण्यात** आला आहे. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| ६ | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस शिंपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना वैद्यकिय रजेवर उपचारार्थ जाते वेळी अर्जदार यांनी फोनव्दारे किंवा प्रत्यक्ष वैद्यकीय रजेबाबतची विनंती केली असता मागणी ग्राहय धरण्यात यावी. | **कार्यासन क्र.६**<br>पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सदर मुद्यांच्या अनुषंगाने या कार्यसनास कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.<br>महाराष्ट्र पोलीस नियमावली, भाग-१ प्रकरण १० रजा व निवृत्तीवेतन विभाग १ रजा नियम क्र. ३४८(१) अन्वये सर्व सरकारी कर्मचारी रजेच्या संबंधात मुंबई नागरी सेवा नियमांनी नियंत्रित आहेत. तसेच प्रकरण ४, नियम क्र.३९ नुसार अर्जदार ज्या कार्यलयात काम करीत असेल त्या कार्यालयाच्या प्रमुखाला कळविल्या शिवाय कोणतेही प्रमाणपत्र प्रतिस्वाक्षरीसाठी सादर करता कामा नये. | पोलीस विभागाची जी कार्यपध्दती आहे ती योग्य आहे.<br>सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| ७ | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस शिपाई ते पोलीस उपनिरीक्षक यांना प्रदन करण्यात येत असलेल्या आहार भत्ता वाढत्या महागाई नुसार वाढ करुन मिळण्यात यावा. | **कार्यासन क्र.३०**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.२६/०८/२०२२ अन्वये पोलीस विभागातील अधिकारी/ अंमलदारांना देण्यात येणा-या अतिकालीक भत्त्यामध्ये (आहार भत्ता) दुप्पटीने वाढ करण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असता,सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन, गृह विभागाने दिनांक ३०/०९/२०२२ च्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांबाबतची माहिती सर्व पोलीस घटकांकडून मागविण्यात आलेली आहे. सदरची मुद्देनिहाय माहिती सर्व घटकांकडून प्राप्त होताच ती एकत्रीतपणे शासनास सादर करण्याची तजवीज ठेवली आहे. | शासनाने मागीतेली माहिती घटकांकडून प्राप्त करुन ती एकत्रीतपणे ताबडतोब शासनास सादर करावे. जेणेकरुन शासन निर्णय लवकर निर्गमित होईल. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| ८ | श्री. एम.के. भंडारे, पोहवा,वाचक शाखा, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग,म. राज्य पुणे. | देशातील तसेच राज्यातील विविध प्रशिक्षण संस्थामध्ये गुन्हे तपासाचे अनुषंगाने विविध प्रकारचे प्रशिक्षण/कोर्स आयोजित केले जातात. त्यामध्ये प्रामुख्याने पोलीस अधिकारी यांचेसाठी प्रशिक्षण/कोर्स आयोजित केलेले असतात. पोलीस दलामध्ये पोलीस अंमलदार हा पोलीस दलाचा कणा आहे. पोलीस अधिकारी तपास अधिकारी असतात परंतु वास्तव्यात गुन्हयांची उकल करणे व शास्त्रशुध्द तपास करुन दोषारोप दाखल करेपर्यंत पोलीस अमंलदारांची महत्वाची भूमीका असते. त्यामुळे गुन्हे तपास व तपासाशी संबंधीत इतर विषयांशी निगडीत तांत्रिक प्रशिक्षण तसेच कोर्स पोलीस अंमलदार यांचेसाठी देखील ठेवयात यावेत. | **<u>पोमसं,प्रशिक्षण व खास पथके,म.राज्य, मुंबई</u>**<br>पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्थायी आदेश क्र.०३/२०२१, दि.२८/१२/२०२१ आणि स्थायी आदेश क्र.०२/२०२२, दि.१२/०७/२०२२ मधील निर्देशानुसार महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस अंमलदारासाठी PSU-१, PSU-२,PSU-३ ची सेवाअंतर्गत प्रशिक्षण सत्रे संबंधित पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित केली जातात. सदर सेवाअंतर्गत प्रशिक्षण मध्ये गुन्हयांची उकल करणे, शास्त्रशुध्द तपास करुन दोषारोप दाखल करणे तसेच गुन्हे तपास व तपासाशी संबंधित इतर विषयांशी निगडीत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षणाकरिता अंमलदार पाठविणेबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते. तथापि घटक प्रमुख पुर्ण संख्येने अंमलदार पाठविण्यात येत नाहीत.<br>१) ज्या पोलीस अंमलदारांनी सेवेची १० वर्ष पुर्ण केली आहेत, त्यांच्याकरिता ०२ आठवडयाचे PSU-I चे सेवाअंतर्गत प्रशिक्षण दि.१८/१०/२०२१ पासून सुरु करण्यात आले आहे. आतापर्यंत PSU-I ची १९सत्रे घेण्यात आली असून ७,१५५ पोलीस अंमलदार पाठविण्यात सांगितले होते. प्रत्यक्षात हजर एकूण ५,५८८ पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण घेतले आहे.<br>२) ज्या पोलीस अंमलदारांनी सेवेची २० वर्ष पुर्ण केली आहेत. त्यांच्याकरिता ०२ आठवडयांचे PSU-२ चे सेवाअंतर्गत प्रशिक्षण दि.२२/११/२०२१ पासुन सुरु करण्यात आले आहे. आतापर्यंत PSU-२ ची १० सत्रे घेण्यात आली असुन २,२५२ पोलीस अंमलदार पाठविण्यास सांगितले होते. प्रत्यक्षात हजर एकूण १,६९९ पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण घेतले आहे.<br>३) ज्या पोलीस अंमलदारांनी सेवेची २५ वर्षे पुर्ण केली आहेत. त्यांच्याकरिता ०२ आठवड्याचे PSU-३ चे सेवाअंतर्गत प्रशिक्षणदि.२०/१२/२०२१ पासून सुरु करण्यात आले आहे. | पुढच्या २०२३ नंतर ५० % पोलीस उपनिरीक्षक हे पोलीस शिपाई मधुन प्रमोशनद्वारे येणार आहे. तेव्हा तपासकामे करावी लागणार आहे. त्यामुळे त्यांना योग्य प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे.<br>वास्तविक पाहता पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण घेतल्याचे प्रमाण म्हणजे संख्या खुप कमी आहे. सर्व प्रशिक्षण केंद्र यांना सदर प्रशिक्षणाचे सत्र वाढवण्याबाबत पोमसं, प्रशिक्षण व खास पथके यांनी कळवावे. तसेच जास्तीत जास्त सांख्यिकी स्वरुपात पोलीस अंमलदार यांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य ठेवावे. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | | आतापर्यंत PSU-३ ची ०५ सत्रे घेण्यात आली असून १००५ पोलीस अंमलदार पाठविण्यास सांगितले होते. प्रत्यक्षात हजर एकूण ७७३ पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण घेतले आहे.<br>तसेच राज्याबाहेरील प्रशिक्षणामध्ये खालीलप्रमाणे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते:-<br>नॉर्थ ईस्टन पोलीस ॲकॅदमी, (नेपा), मेघालय आणि गांधीनगर, गुजरात येथे पोलीस अंमलदारांकरिता गुन्हे तपास व तपासाशी संबंधित इतर विषयांशी निगडीत तांत्रिक कोर्स तसेच प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातात. प्रत्येक प्रशिक्षणाकरिता जास्तीत जास्त ४ ते ५ नामनिर्देशने मागविली जातात. त्यामुळे प्राप्त नामनिर्देशना मधुन फक्त ४ ते ५ अंमलदार यांचे नामनिर्देशन पाठविणे शक्य होते. | |
| ९ | पोउपनि/पीपी खडपकर,<br>एफ कंपनी नायक,<br>समादेशक<br>राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | पोलीस दल(एस आर पी एफ) हा २४ तास सेवेत रहाणारा फोर्स आहे. तर त्या सेवेबद्दल सेवाकर आकाराला जातो. तो आकराल जावु नये. कारणकी सेवेला सेवाकर नसतो. | **कार्यासन क्रमांक ३०**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.३०/११/२०२२ च्या ज्ञापन्वये समादेशक, रारापोबल, गट क्र.२ पुणे यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहे. | सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे मासिक वेतनातून नियमाप्रमाणे P.Tax कपात करण्यात येतो. सदर **मुद्द निकाली काढण्यात** येत आहे. |
| १० | पोउपनि/पीपी खडपकर,<br>एफ कंपनी नायक,<br>समादेशक<br>राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | राज्य राखीव पोलीस दल हे नेहमी सतत बाहेर बंदोबस्ताकरिता (३६० पैकी २४०/२६० दिवस) असते. बंदोबस्त दरम्यान मेस कपात प्रतीदिन १०० रुपये आहे. सदर मेसचा खर्च हा वेतनातून कपात होतो. त्यामुळे वेतन कमी मिळते. | **कार्यासन क्रमांक ३०**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.३०/११/२०२२ च्या ज्ञापनान्वये (प्रत संलग्न) समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.२ पुणे यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. | अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, मुंबई यांनी याबाबत अभिप्राय सादर करावा. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | तरी, निमलष्कर दल( सी आर पी एफ) याप्रमाणे शासन पुरस्कृत प्रती महा रुपये ३००० ते ३५०० (पदनिहाय) राशन भत्ता मिळावे हि नम्र विनंती. | | |
| ११ | पोहवा/७७९ प्रशांत वासुदेव पाटील/७७९, पोलीस अधीक्षक अकोला | महाराष्ट्रातील सर्व घटकात देण्यात येणारे रेल्वे वारंट यांची साईज अतिशय मोठी असून सदर वारंट हातळतांना त्याचे व्यवस्थीत व्यवस्थापन करतांना अतिशय अडचण होते तसेच पेपरची क्वालीटी खुपच पातळ असल्याने व रेल्वे प्रशासनाचे वारंट संबंधी धोरण कठोर असल्याने शक्य असल्यास सदर वारंटची साईज भारतीय सेना दलाचे कर्मचारी यांना देण्यात येणारे वारंट प्रमाणे पोलीस दलातील वारंटची साईज व दर्जाचे अपग्रेडेशन करण्याबाबत विचार होणेस विनंती आहे. | **<u>कार्यासन क्रमांक १९-</u>**<br>महाराष्ट्र राज्यातील पोलीस अधिकारी/अंमलदार हे शासकीय कामासाठी रेल्वेने प्रवासकरण्याकरिता रेल्वे पोलीस वॉरंटचा वापर करतात. सदर रेल्वे पोलीस वॉरंट पेलीस घटकांकडून मागणी पत्रकान्वये मागणी केल्यानंतर त्याचा पुरवठा हा व्यवस्थापक, येरवडा करागृह मुद्रालणालय, पुणे यांचेकडून करण्यात येतो.<br><br>२. सदरचे रेल्वे पोलीस वॉरंट हे खूप मोठे असून ते हाताळतांना व त्याचे व्यवस्थित व्यवस्थापन करतांना अतिशय अडचण होत असते. तसेच पेपरची क्वॉलीटी खूपच पातळ असल्याने व रेल्वे प्रशासनाचे वॉरंट संबंधीचे धोरण हे कठोर असल्योन शक्य असल्यास रेल्वे पोलीस वॉरंटची साईज ही भारतीय सेना दलाचे कर्मचारी यांना देण्यात येणा-या वॉरंटच्या साईज व दर्जाचे करण्याबाबत पोलीस अंमलदार यांनी या कर्यालयास विनंती केली आहे.<br>३. तरी व्यवस्थापक, येरवडा यांना १८/०१/२०२३ च्या पत्रान्वये, रेल्वे वॉरंटची साईज ही भारतीय सेना दलाचे | महाराष्ट्रातील सर्व घटकात देण्यात येणारे रेल्वे वॉरंट हे भारतीय सेना दला प्रमाणे देता येईल का ? याबाबत तपासणी करावे तसेच शासकीय मुद्रनालय यांच्याकडुन प्राप्त होणारे वॉरंट चे कागद हे दर्जेदार असावे याबाबत सुध्दा शासकीय मुद्रनालय यांना पत्राद्वारे कळवावे. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | | कर्मचारी यांना देण्यात येणा-या वॉरंटच्या साईज व दर्जाचे अपग्रेडेशन करणे शक्य असल्यास त्याप्रमाणे रेल्वे पोलीस वॉरंटचे अपग्रेडेशन करण्यात यावे व तसे या कार्यालयास कळवावे, याबाबत विनंती करण्यात आली आहे. | |
| १२ | पोहवा/७७९ प्रशांत वासुदेव पाटील/७७९, पोलीस अधीक्षक अकोला | महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक जिल्हा स्तरावर आगामी पोलीस भरतीची प्रक्रीया सुरु होणार आहे. तसेच भरती प्रक्रीयेमध्ये संगणकाचा प्रभावीपणे वापर सद्यस्थितीत होत आहे. परंतु सदर संगणकीय माहीती तसेच संगणक वापर करणारे कर्मचारी आपआपले सोयीनुसार संगणकावर आपले जिल्हयातील भरती प्रक्रीया एकच प्रमाणीत सॉप्टवेअर विकसीत केल्यास सर्व घटकांमध्ये सुसुत्रता राहून भरती प्रक्रीया आणखी सोयीची होण्यास मदत होईल करीता सदर मुद्यांवर विचार होणेस विनंती आहे. | **<u>पोमसं, प्रशिक्षण व खास पथके,म.राज्य, मुंबई.</u>**<br>सन २०२१ पोलीस शिपाई भरतीकरिता संपूर्ण महाराष्ट्रातून ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज स्विकारण्याकरिता शासनाच्या महाआयटी या विभागाची निवड करण्यात आली आहे. | महाआयटी द्वारे पोलीस शिपाई भरती चालू आहे.<br>सदर **मुद्दा निकाली काढण्यात** आला आहे. |
| १३ | पोहवा/७७९ प्रशांत वासुदेव पाटील/७७९, पोलीस अधीक्षक अकोला | महाराष्ट्रातील ज्या अंमलदारांना यांचे वय ५० वर्षाचे वर आहे. असे सर्व अंमलदार यांना पोलीस मुख्यालय येथे परेड ऐवजी योगा क्लास तसेच संपूर्ण वैद्यकीय तपासणी वर्षातून १ वेळा अनिवार्य केल्यास कामावरील ताण कमी होवून त्यांचे स्वास्थ मन प्रफुल्लीत राहून त्यांची कार्यक्षमता वाढील लागेल करीता सदर मुद्यांवर | **<u>कार्यासन क्रमांक -२८-अ</u>**<br>सदर प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. मा. अध्यक्ष महोदय सदर प्रकरणी योग्य ते निर्णय घेतील. | शासकीय कर्मचारी यांच्या आरोग्य तपासणी करीता माहे एप्रील, २०२२ मध्ये शासन निर्णय झालेला आहे. सदरबाबत नस्तीवर सादर करुन अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्या मार्फतीने सर्व घटकांना परिपत्रकाद्वारे पाठविण्यात यावे. जेणकरुन सर्वांना लाभ मिळेल. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | विचार होणेस विनंती आहे. | | |
| १४ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई | लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील कर्जत व पालघर लोहमार्ग पोलीस ठाणेत नेमणुकीस असलेल्या पोलीस अधिकारी/ अंमलदार यांना शहरी दराप्रमाणे घरभाडे भत्ता मिळणेबाबत (कारण लोहमार्ग आयुक्तालय शहरी भागात असल्याने) | **कार्यासन क्र.३०**<br>राज्य शासकीय कर्मचा-यांना घरभाडे भत्ता मंजूर करण्याच्या प्रयोजनार्थ राज्यातील शहरे/गांवे यांचे शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.घभाभ-१०१५/प्र.क्र.१९/सेवा-५, दि.१६/१२/२०१६ सोबतच्या जोडपत्र-१ नुसार पुनर्वर्गीकरण करण्यात आलेले आहे.<br>सदर बदलेले/सुधारीत वर्गीकरण विचारात घेवून संबंधित शहरांना/गावांना,"एक्स" "वाय" व "झेड" वर्गीकृत भत्याचे दर शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.घभाभ-२०१९/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०५/०२/२०१९ अन्वये सुधारीत करण्यात आले आहेत. तसेच महागाई भत्त्याची रक्कम ही ५० टक्के ,२० टक्के व १० टक्के अशा वाढीव दराने घरभाडे भत्ता मंजूर करण्यात यावा असा शासन आदेश आहेत. पोलीस आयुक्तालय लोहमार्ग, मुंबई हे ठिकाण मुंबई नागरी समुहात मोडत असल्याने सदर ठिकाणी कार्यरत पोलीस अधिकारी/अंमलदार यांना "एक्स" वर्ग शहरांना अनुज्ञेय असलेला घरभाडे भत्ता लागू होतो. तसेच लोहमार्ग पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेली कर्जत व पालघर ही ठिकाणे "एक्स" वर्ग शहरांमध्ये मोडत नसल्याने, सदर ठिकाणी कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांना शहरी दराप्रमाणे घरभाडे भत्ता देणे प्रशासकीयदृष्टया शक्य होत नाही. | शासनाने वर्गीकरण केलेल्या धोरणानुसार / शहराच्या नेमणुकीनुसार घरभाडे भत्ता मिळेल. त्यात बदल करता येणार नाही. |
| १५ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई | दैनंदीन कर्तव्याच्या ठिकाणी रेस्ट रुमची आवश्यक्ता आहे. (कर्तव्यादरम्यान जेवणासाठी, तसेच गणवेश बदलण्यासाठी त्याचा विनियोग होईल व तो स्वत: त्याठिकाणी | **पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.**<br>**सदर प्रकरणी अभिप्राय अप्राप्त आहे.** | ताबडतोब अभिप्राय मागवा. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | कर्तव्यावर हजर मिळून येईल.) | | |
| १६ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबइ | परिभाषित निवृत्ती वेतन योजनेमध्ये असलेल्या सर्व अधिकारी व अंमलदार यांचे काही हफ्ते गहाळ असलेबाबत. | **कार्यासन क्र.३२**<br>सदर मुद्याच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, पोलीस महासंचालक कार्यालयाच्या आस्थापनेवरील वेतन घेत असलेल्या मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी यांचेपैकी जे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे सभासद असतील आणि त्यांचेपैकी कोणाचे अंशदान निवृत्तीवेतन खात्यातील काही हप्ते गहाळ असल्यास त्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही या कार्यासनातून केली जाते. परंतु पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे हप्ते गहाळ असल्यास त्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही संबंधित घटकाकडून केली जाते या कार्यासनाकडून केली जात नाही. | पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे परिभाषीत निवृत्ती योजनेमध्ये सर्व हप्ते कपात झाले आहेत का ? याबाबत ते सर्व घटकप्रमुखांनी लेखाकोष यांच्याशी समन्वय साधून तपासणी करण्याबाबत.<br>कार्यासन क्र. ३२ यांनी परिपत्रक सर्व घटकांना पाठविण्यात यावे. |
| १७ | सहा समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४ (भाराब-१), औरंगाबाद | राज्य राखीव पोलीस बलातील पोलीस सशस्त्र पोलीस शिपाई ते सहायक फौजदार पर्यंतच्या अंमलदारांना सशस्त्र पोलीस उपनिरीक्षक पदांच्या परिक्षकरिता ८ ते १० वर्ष सेवेची अट करण्याबाबत. | **अपर पोलीस महासंचालक रा.रा.पो.बल महाराष्ट्र राज्य, मुंबई.**<br><br>अप्राप्त आहे | अपर पोलीस महासंचालक , राज्य अपर पोलीस महासंचालक, राखीव पोलीस बल, मुंबई यांनी याबाबत परिपुर्ण अभ्यास करुन अहवाल सादर करावा. |
| १८ | सहा.समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१४(भाराब-१) औरंगाबाद | ०८ साप्ताहिक सुटयांचे मोबदल्याबाबत<br>शासन निर्णयाप्रमाणे महाराष्ट्र राज्य पोलीस बलातील सर्व पोलीस अंमलदार यांना त्यांनी त्यांचे साप्ताहीक सुट्टी दिवशी केलेल्या कामाचा ०१ कॅलेंडर वर्षात ०८ | **कार्यासन क्र.३०**<br>कार्यालयीन क्र.पोमसं/३०/रा.स्त.पो.क.वृंद.प/५४ वी सभा/१४७/२०२२, दि.२४/०१/२०२३ अन्वये,अपर पोलीस महासंचालक रा.रा.पो.बल म.राज्य, मुंबई यांना सदर मुद्याच्या अनुषंगाने त्यांचे सविस्तर अभिप्राय तात्काळ कार्यासन पाठविण्याबाबत कळविले आहे. | अपर पोलीस महासंचालक , राज्य राखीव पोलीस बल मुंबई यांनी याबाबत परिपुर्ण अभ्यास करुन अहवाल सादर करावा. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | कार्यासनाचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|---|
| | | साप्ताहिक सुट्टी दिवशी कामाचा मोबदला देण्यात येण्याबाबत कळविले असल्याने मा. अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई यांचे परिपत्रक सुधारीत करणे अत्यंत आवश्यक आहे.<br>तरी, शासन निर्णयाप्रमाणे सुधीरीत परिपत्रक निर्गमित करणेबाबात मा. अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.राज्य, मुंबई यांना आपले मार्फतीने आदेशीत करण्यात यावे ही विनंती. | | |

******

## ५४ व्या राज्य स्तरीय कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये सभासदांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले नवीन मुद्दे

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|
| १ | पो.नि. व्ही.एम. केंद्रे, पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर | पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या वैद्यकीय देयकावरील Income Tax माफ करण्यात यावा. | सदरचे नियम फक्त पोलीस विभागांना नाही तर सर्व केद्र आणि राज्य शासकीय कर्मचाऱ्याना लागू आहे. हे केंद्र शासनाचे नियम आहेत.<br>सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| २ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे येथे आधुनिक पध्दतीने तंत्राज्ञानाने विकसित शाळा व्हाव्यात व सदरच्या शाळा चांगल्या संस्थेकडे चालवावयास द्याव्यात. बाहेरच्या शाळेत फि जास्त असते व लांबचा प्रवास करावा लागतो. | बरेचशे राज्य राखीव पोलीस बल हे बहूतेक शहराच्या ठिकाणी आहेत त्यामुळे तेथे शाळेची कमतरता नाही.<br>ही अडचण सर्वच गटाची नाही, फक्त काही गटाची आहे.<br>**अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई.** |
| ३ | श्री. संतोष एम. कविटकर, पोहवा/१२७५ सायबर, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा निवृत्तीपुर्वी मृत्यू झाल्यास त्यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नोकरीकरिता प्रतिक्षाधिन यादीत नाव समाविष्ठ करण्यात येते. परंतु नोकरी मिळणेकरिता विलंब लागतो. ज्या पाल्याचे नांव नोंदविले जात त्याला इतरत्र नोकरी मिळाल्यास अनुकंपा यादीवरील नाव कमी करण्यात येते. पण २ अपत्य असणा-या अधि./कर्मचा-याचे अपत्यास दुस-या मुलास नोकरी देणे जरुरी असल्याने दुस-या मुलाचे नांव नोंदणीस मुभा / तरतुद असावी. | याबाबत अनुकंपा तत्वावरील वारसाचे नाव काही कारणास्तव बदल्याची एक वेळ संधी देण्याबाबत कार्यासन क्र. ६ ने सविस्तर प्रस्ताव शासनास सादर करावा.<br>**कार्यासन क्रमांक-६** |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|
| ४ | | पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास त्यांना मिळणा-या शासकीय रक्कमा पत्नीचे नाव नामनिर्देशित आहे तिलाच मिळतात. परंतु त्याचा आई-वडिलांना कोणताही लाभ होत नाही. | पोलीस दलातील पोलीस अधिकारी / अंमलदार यांच्या मृत्युनंतर मिळणाऱ्या लाभा बाबत टक्केवारी नुसार नामनिर्देशित करण्याबाबत परिपत्रक काढण्याबाबत सर्व घटकांना निर्गमित करावे.<br>**अपर पोलीस महासंचालक, आस्थापना म.राज्य, मुंबई** |
| ५. | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | सुकाणु समितीन्वये पोलीस नाईक हे पद रदद झालेले आहे. १०-२०-३० चे आश्वासित प्रगती योजनेनुसार त्यांची वेतननिश्चिती होण्यास घटकांमध्ये संदिगधता आहे. | सदरबाबत आपल्या घटकप्रमुखाद्वारे लेखी स्वरुपात अपर पोलीस (आस्थापना) यांच्याकडे सर्व मुद्दे नमुद करुन पाठविण्यात यावे. याबाबत निर्णय घेण्यात येईल.<br>**अपर पोलीस महासंचालक, आस्थापना म.राज्य, मुंबई** |
| ६. | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | राज्य राखीव पोलीस बल गटाच्या कंपन्या या बाहेर बंदोबस्त कामी असतात. जर प्रवास भत्ता मुळ वेतनाच्या १% किंवा १.५% मिळावा. असा शासन निर्णय झाला तर पोलीस खात्यास वारंवार प्रवास भत्ता वाढवावा ही मागणी करण्याची गरज नाही. प्रतिवर्ष मुळ वेतनानुसार प्रवास भत्यात वाढ व्हावी. | सदरबाबत दि. ०४/०२/२०२२ अन्वये महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/अंमलदार यांना देय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात तिप्पटीने वाढ करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदरबाबत **अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी पाठपुरावा करावा.** |
| ७ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | पोलीस अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व रक्कमा मिळाव्यात | सदरबाबत उशिर होता कामा नये. सेवानिवृत्तीपूर्वी विहित कालावधीत वेतन पडताळणीच्या सर्व बाबी पूर्ण करणे आवश्यक आहे. याबाबत स्थाई आदेश काढुन सर्व घटकांना कळविण्यात यावे.<br>**कार्यासन क्रमांक-६** |
| ८ | श्री. संतोष एम. कविटकर, पोहवा/१२७५ सायबर, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण | राज्य राखीव पोलीसदलातील अपघातामुळे व्याधीग्रस्त असलेले तसेच शारीरिक अवयव Transplant केलेल्या अंमलदारांना नक्षल भागातील बंदोबस्त देण्यात येवू नये, त्यांना स्थानिक कंपनी / प्रशासन विभाग येथे नेमण्यात यावे. | सदरचा प्रश्न हा वैयक्तिक आहे . त्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांचा शारीरीक अवयव Transplant झालेला आहे त्यांनी वैयक्तिक स्वरुपात घटक प्रमुखांना विनंती करावी.<br>मुद्दा **निकाली काढण्यात येत** आहे. |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|
| ९ | श्री. काशिनाथ महादेव गुरव, सपोफौ./९०७, रत्नागिरी | ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह दिले जाते. त्यासोबत एक वेतनवाढ देखिल देण्यात यावी. | सदर बाब शक्य नसल्याने सदर **मुद्दा निकाली काढण्यात येत** आहे. |
| १० | श्री. काशिनाथ महादेव गुरव, सपोफौ./९०७, रत्नागिरी | घटकात वाचक शाखा अस्तित्वात असते. सदर शाखेत अंमलदार यांची मंजूर पदे नाहीत. तेथे पोलीस ठाण्यांकडून किंवा इतर शाखेंकडून अंमलदार नियुक्त केले जातात. तरी वाचक शाखेत अंमलदारांची मंजूर पदे निर्माण करण्यात यावीत. | विचार करण्यात येईल.<br>**कार्यासन क्रमांक-६** |
| ११ | श्री. सुरेश परदेशी, पी.सी.आर., नाशिक | Covid-१९ मध्ये जे अधिकारी/कर्मचारी इस्पितळात दाखल झाले होते. त्यांचेकडून अनामत रक्कम घेण्यात आलेली आहे. ती अद्याप परत मिळालेली नाही. | संबधित पोलीस अधिकारी /कर्मचारी यांनी अपर पोलीस महासंचालक (प्रशासन) यांच्याकडे लेखी स्वरुपात माहिती पाठवावी.<br>**कार्यासन क्रमांक-२८-अ** |
| १२ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | ७ वेतन आयोगानुसार १ जानेवारी व जुलै ही वार्षिक वेतनवाढ निश्चित करण्यात आलेली आहे. परंतु ३० जुन रोजी निवृत्त होणा-या अधि./कर्मचारी यांना १२ महिने सेवा केलेली वेतनवाढ मिळावी. | शासनाची अशी भुमिका आहे की, १ जुलै रोजी जे अधिकारी/कर्मचारी कर्तव्यावर हजर असतील त्यांनाच देय वार्षिक वेतन वाढ देण्यात येईल. ३० जुन रोजी सेवानिवृत्त होणाऱ्याना शासन नियमानुसार वार्षिक वेतनवाढ देता येणार नाही.<br>सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे |
| १३ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | राज्य राखील पोलीस बल येथे निवासस्थानाची कमतरता आहे. तसेच काही इमारती निष्कासित झाल्या आहेत. तरी नवीन इमारती बांधून मिळणेबाबत. | शासकीय निवासस्थानाबाबत शासनाचे विविध उपक्रमांतर्गत तसेच पोलीस हौसिंग अंतर्गत नविन निवासस्थान बांधण्याचे शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत. पुढील काळात अनुदानाची उपलब्धता झाल्यावर पुढील कार्यवाही कारण्यात येईल.<br>**अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, म.राज्य, मुंबई** |

| अ. क्र. | सभासद व घटकांचे नांव | उपस्थित केलेला मुद्दा | मा. अध्यक्षांचे आदेश निर्देश |
|---|---|---|---|
| १४ | पोउपनि/पी.पी. खडपकर, एफ कंपनी नायक, समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२, पुणे | राज्य राखील पोलीस बल येथे सहाय्यक पोलीस आयुक्त यांची ७३ पदे रिक्त आहेत. सदरची पदे भरल्यास मागील अधिका-यांना पदोन्नतीचा लाभ लवकर मिळेल तसेच इतर अधिका-यांवर येणारा अधिक कामाचा ताण कमी होईल. | सदरबाबत अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पो. बल, मुंबई यांनी एक आठवडयाच्या आत सविस्तर प्रस्ताव पाठविणे. सदर प्रस्ताव **कार्यासन क्र. २** कडुन शासनास पाठविण्यात येईल. |
| १५ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी योजनेची बैठक मागील वर्षभरात झालंली नाही. | मार्च-२०२३ मध्ये मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी योजनेची बैठक प्रस्तावित केलेली आहे. **सदर मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |
| १६ | श्री. व्ही.व्ही. जिंदे, पोलीस शिपाई पोलीस आयुक्त, सोलापुर शहर | दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत शासकीय रक्कम प्रत्येक हेड नुसार घटकांना वितरीत केल्या जातात. परंतु सदर काळात योग्य नियोजन घटकांकडे नसल्याने अनुदान शासनाकडे परत पाठविले जाते. तरी सदर कालावधीत प्रत्येक घटकात एक समिती नियुक्त करावी. | सदर बाबत घटक प्रमुखांनी त्यांचे स्तरावर कार्यवाही करावी .<br>सदर मुद्दा **निकाली काढण्यात** येत आहे. |
| १७ | श्री. एम.के. भंडारे, पोहवा, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे | अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आस्थापनेवर पो.शि. / पो.हवा (एटप) ही पदे मंजूर आहेत. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक हे पद मंजूर करण्यात यावे. | अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषन विभाग, पुणे यांचेकडुन सविस्तर मुद्देनिहाय माहिती मागवुन शासनास प्रस्ताव सादर करणे.<br>**कार्यासन क्रमांक-६** |
| १८ | श्री. प्रदिप पाटील, पोलीस अधीक्षक, जळगांव | एप्रिल-२०१९ पासुन साप्ताहिक सुटटी देयके प्रलंबित आहेत. | दि. २७/१२/२०२२ रोजी ५८ लाख रुपये जळगांव ला निधी वितरीत केला आहे आणि त्यांनी तो खर्च केला आहे.<br>**सदर मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

****